# मे.न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयांत.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समोर)

**लवाद दावा क्रमांक १५४/२०२२**

श्रीपाद पांडुरंग खिस्ती आणि इतर

**विरुद्ध**

जिल्हा सहकारी· निवडणूक अधिकारी आणि इतर

**निशाणी ९४ वरील आदेश**

१. वादी यांनी सदरचा अर्ज आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया साहिता अंतर्गत दाखल केला असून वाडीचे कथन आहे कि या दाव्याचा निकाल दि.०३/१०/२०२३ रोजी करण्यात आला आणि त्या निकालाविरुद्ध वादीने अपील न्यायालय येथे अपील न.६३/२०२३ दाखल केले. त्याचा निर्णय दि.२०/०२/२०२४ रोजी झाला आणि मतमोजणी पुन्हा करण्याचा आदेश करण्यात आला. आदेश्याप्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती होऊन दोन्ही बाजूच्या समक्ष मत मोजणी करण्यात आली.

२. उपरोक्त बदलामुळे व झालेल्या घटनामुळे दाव्यात काही दुरस्ती करणेआवश्यक आहे.दावा कलम १० नंतर १०-अ चा समावेश करावा.

(१०-अ) प्रतिवादी न.३ या संस्थेची निवडणूक प्रक्रिया सहकारी नियमाप्रमाणे पार पडली गेली नाही. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणे हि प्रक्रिया अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केलेपासून १० दिवसाच्या आत राबविणे आवश्यक होते.या प्रकरणात कालावधी पाळला गेला नाही.तसेच निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेपासून नाम निर्देशनाची शेवटची तारीख यासाठी सहकार कायद्यात

अभिप्रेत असलेली मुदत पाळली गेली नाही.निवडणूक कार्यक्रमामध्ये मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ३.०० पर्यंत आहे. प्रत्यक्ष मतदान सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत घेण्यात आले. या कारणाने निवडणूक प्रक्रिया बिकायदेशीर आहे.

(१०-ब). सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे निवडणुकीत भाग घेणा-या उमेदवारांनी नामनिर्देशन शुल्क निर्वाचित अधिका-याकडे ठेव म्हणून ठेवल्याखेरीज किवा ठेवण्याची व्यवस्था केल्याखेरीज एखादा मतदार संघातून त्याला निवडणुकीसाठी यथोचित रित्या नामनिर्देशित करणेत आलेचे समजण्यात येणार नाही.परंतु प्रस्तुत निवडणुकीत कोणतेही अनामत रक्कम कोणत्याही उमेदवाराने निर्वाचन अधिकारीअथवा संस्थेकडे जमा केले नाही.तसेच अनामत सदर रक्कम नियमाप्रमाणे परत करणे अथवा ज्याची जप्त होईल त्यांची निवडणूक फंडासाठी जप्त अथवा जमा करणे या कोणत्याही बाबी पार पाडल्या नाही.यातूनही हि निवडणूक बेकायदेशीर ठरते.

(१०-क).फेर मतमोजणी झालेवर दिसून आलेली तफावत हि गंभीर स्वरुपाचीअसून मतांच्या आकडेवारी तसेच गुणानुक्रमात बदल होत आहे.त्यातही निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर असलेचे दिसते.

(१० बा) वादीने केलेल्या कथनानुसार प्रतिवादी न.३ यांची सन २०२२-२३ ते २०२७-२०२८ या कालावधीकरिता घेतलेली निवडणूक व निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर असलेचे जाहीर ठराव करून मिळावा.

सदरची दुरस्ती हि subsequent event. स्वरुपाची आहे.दाव्याचे स्वरूपावर परिणाम होत नाही.करिता वादीचा अर्ज.

३. प्रतिवादी न.४,६,८,११ ते १४ यांनी अर्जाला उत्तर दाखल करून निवेदन केले कि, वादीचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. दाव्यामध्ये मुद्दे काढून त्यामध्ये न्याय निर्णय झाल्यानंतर वादी यांनी मा. सहकार अपील न्यायालय मुंबई बेंच औरंगाबाद यांचे समोर अपील दाखल केले होते. त्यामध्ये झालेल्या आदेशाप्रमाणे फेरमतमोजणी कोर्ट कमिशनर मार्फत झालेली आहे.`कोर्ट कमिशनर यांनी दिलेल्या अहवालावरून निवडून आलेल्या उमेदवारामध्ये आणि पराभूत उमेदवारामध्ये बराच फरक आहे.

४. प्रतिवादी संस्थे तर्फे सचिव यांनी म्हणणे दाखल करून कथन केले कि उमेदवारी म्हणून भरलेली डीपाजीट हि निवडणूक अधिकारी श्रीगोंदा कार्यालय येथे फॉर्म भरणे स्वीकृत करणे यांनी राबवली आहे त्यामुळे संस्थेकडे रोजकिर्दला निवडणूक डीपाजीट कोणताही जमा आदेश नाही. निवडणूक डीपाजीट हे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे जमा केले आहे.

५. वादीने दाखल केलेल्या अर्जाच्या अनुशंगाने खालील मुद्दा उपस्थित होतो.

**वादीचा अर्ज मजूर करणे योग्य आहे का ?**

वादी आणि प्रतिवादी वकिलांचा युक्तिवाद एकला . वर नमूद केलेप्रमाणे वादी हे त्यांचे दाव्यात कलम १०-अ ते १०-बा परिच्छेद समाविष्ट करू इच्छित आहे. त्यांचे कथाना नुसार कोर्ट कमिशनर यांनी फेर मत मोजणी केली आणि म्हणून या घटनेमुळे दाव्यामध्ये दुरस्ती करणे आवश्यक आहे.दाव्याचे अवलोकन केले असता दिसून येते कि वादीचा दावाचा न्याय निवाडा दि.०३/१०/२०२३ रोजी करण्यात आला आणि वादी यांनी या निकाला विरुद्ध मा. अपील न्यायालय यांचेकडे अपील दाखल केले आणि मा. अपील न्यायालयाने फेरमत मोजणी कोर्ट कमिशनर मार्फत करण्याचे या न्यायालायला आदेश दिला आणि कोर्ट कमिशनर च्या अहवालानुसार अंतिम डिक्री तयार करण्याचे आदेश दिला.

६. प्रथमता वादीने सुचविलेली वर नमूद दुरस्ती या क्षणी आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया साहिंता नुसार मंजूर करता येते का. "आदेश ६ नियम १७ दि.प्र.स.प्रमाणे न्यायालयाला प्रकरणाच्या कोणत्याही स्टेज ला दुरस्ती अर्ज वादातील मुद्दा ठरविणे करिता मजूर करण्याचा अधिकार आहे. परंतु या कलमाचे उपकलम दर्शविते कि न्याय चौकशी सुरु झाले नंतर पक्षकाराने योग्य टी खबरदारी घेऊनसुद्धा न्याय चौकशी होनेपुर्वी तो बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज दुरस्ती अर्ज मजूर करता येणारनाही."

७. प्रस्तुत प्रकरणाचा विचार केल्यास दिसून येते कि वादी यांना दाव्यात करू इच्छित असलेली दुरस्ती जे कि अर्जात नमूद केले ती करण्याची संधी दावा दाखल करतेवेळी उपलब्द होती कारण वर नमूद दुरस्ती हि संस्थेने घेतलेल्या निवडणुकीचाभाग आहे.निडवणूक झाले नंतर वर नमूद घटना (दुरस्ती) घडली नाही. सुचविलेली वरील १०-बा दुरस्ती हि दाव्यातील कलम १४-क मध्ये होती. वर नमूद १०-क चा विचार केले असता हि दुरस्ती मजूर करता येणार नाही कारण मा. अपील न्यायालयाने या न्यायालयाला कोर्ट कमिशनर मार्फत फेरमतमोजणी करून अंतिम डिक्री पारीत करण्याचा आदेश केला आहे. मा. अपील न्यायालयाने वादीचा दावा अंतिमः निकाली काढला आहे. वादीचे कथन आहे कि सदरची दुरस्ती हि subsequent event आहे. परंतु वादीने सुचविलेली दुरस्ती हि subsequent event नाही कारण वर उल्लेख केलेप्रमाणे दावा दाखल करतेवेळी नमूद बाबीचा दाव्यात समावेश करण्यःची संधी उपलब्द होती. वर नमूद बाब हि निवडणूक कार्यक्रम संदर्भात असल्याने हि नंतर घडली असे म्हणता येणार नाही.त्यामुळे वादीला या क्षणी सुचविलेली दाव्यात दुरस्ती मजूर करणेयोग्य नाही. वादीने दाखल केलेल्या अर्जात कोणतेही तथ्य नाही. करिता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज **नामंजूर** करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

अहमदनगर
दि.०३/०८/२०२४

बी.एस.लखोटे
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अहमदनगर

## मे.न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयांत.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समोर)

**लवाद दावा क्रमांक ७८/२०२२**

अहमदनगर शहर सहकारी बँक लि.
नवी पेठ अहमदनगर ,

विरुद्ध

उज्जल इलेक्ट्रीक मोटार प्रा.लि. आणि इतर

**निशाणी ७७ वरील आदेश**

१. प्रतिवादी नं. ६ व प्रतिवादी नं. ७ ते ११ यांनी सदरचा अर्ज मौजे ढगारेखेड येथील प्रतिवादी यांच्या मालकीचे शेत गट क्र.४० क्षेत्रफळ १.६७ हे.आर व गट नं.५८ क्षेत्रफळ ४.४७ हे.आर. पैकी ३.४५ हे.आर. व इतर प्रतिवादी यांची शेतजमिन न्यायालयामार्फत जप्त करण्याचा अर्ज केला होता. अर्जानुसार न्यायालयाने दि .२३/०२/२०२२ रोजी निशाणी ५ वर आदेश पारित करुन मिळकत जप्त करण्याचा आदेश पारित करण्यात आला.

२. न्यायालयाने जप्त केलेल्या मिळकतीपैकी प्रतिवादी नं. ६ ते ११ यांनी प्रतिवादी क्र. १ब यांच्याकडुन दि. १९/१०/२०२२ रोजी ो शेत गट क्र.४० क्षेत्रफळ १.६७ हे.आर व गट नं.५८ क्षेत्रफळ ४.४७ हे.आर. पैकी ३.४५ हे.आर. दस्त क्र. ५४७३ व ५४७४ नुसार रक्कम रु. ९३ लाख ला विकत घेतले. वादी बँकेच्या परवानगीने रक्कम रु. ९३ लाख आरटीजीएस नुसार अमरावती येथील बँकेच्या खात्यामधुन दि. २६/०९/२०२३ रोजी वादी बँकेच्या खात्यात जमा केली.वादी बँकेने दि.२३/०२/२०२२ रोजीच्या नि.५ वर पारित केलेले आदेशावरुन जप्त केलेली शेत जमिन मोकळी केली आहे. प्रतिवादी ६ ते ११ यांचा संबंध केवळ गट नं.४० व ५८ यांच्या खरेदीची रक्कम मिळण्यापुरता मर्यादित होता. रक्कम प्राप्त करण्यासाठी वादीने प्रतिवादी ६ ते ११ यांना दाव्यात समावेश केला आहे. वादी यांचा प्रतिवादी ६ ते ११ बाबत उददेश पुर्ण झाल्यामुळे त्यांच्या नावे दाव्यातुन कमी करण्यात यावे.

३.		प्रतिवादीच्या अर्जाला वादी बँकेने अर्ज मंजुर करण्यास हरकत नाही असे उत्तर दिले. दाव्याचे अवलोकन केले असता दिसुन येते की, वादी बँकेने नि. ५ वर दाखल केलेला अर्ज दि. २३/०२/२०२२ रोजी मंजुर करुन या अर्जातील मिळकत गट क्र. ४० व ५८ जप्त करण्यात आली होती. प्रतिवादी नं. ६ ते ११ यांनी वादी बँकेकडे रक्कम रु. ९३ लाख जमा केले आणि वादीला याबाबत कोणतीही हरकत नाही. प्रतिवादीने दाखल केलेल्या नि. ९५ वरील दि. २९/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये वरील जप्त केलेली गट नं. मिळकत मुक्त केली आहे. त्यामुळे प्रतिवादी नं ६ ते ११ विरुध्द दावा चालविण्याकरीता कोणतेही कारण बाकी राहीलेले नाही. वादीची प्रतिवादी ६ ते ११ यांना दाव्यातुन कमी करण्याची कोणतीही हरकत नसल्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी नं. ६ ते ११ यांना दाव्यातुन कमी करण्यात येत आहे.

अहमदनगर
दि.२९/०९/२०२३

बी.एस.लखोटे
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अहमदनगर